# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 09/10/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत मौजा पोलीस स्टेशन देवलापार समोर हायवे क्र. ४४ समोर दिनांक ०८/१०/२०२३ चे ०७.३० वा. ते ०८.२५ वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी केली असता आरोपी चालक १) शेख नदीम अहमद कुरेशी, वय ३७ वर्ष याने आपल्या साथीदार २) विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांचेसह आपल्या ताब्यातील ६ चक्का आयसर क्र. CG 08 AT 8086 या वाहनामध्ये गोवंश जनावरांना अत्यंत कुर व निर्दयतेने वाहनात कोंबुन आखुड दोरीने पाय व तोंड दाबुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुरे जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करूण घेवुन जातांनी मिळुन आल्याने त्या गाडीतील जनावरांची पाहणी केली असता गाडी मध्ये १) ०९ नग काळे रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी किंमती १५,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती १,३५,०००/–रू (२) २० नग पांढरे रंगाचे गोवशं बैल प्रत्येकि किंमती १०,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती २,००,०००/–रू एकुण ३,५०,०००/– रू चे गोवंश जनावरे दिसल्याने सदर गोवंश जनावरे हे नमुद ६ चक्का आयसर क्र. CG 08 AT 8086 किंमती १०,००,०००/–रू व यातील एकुण २९ नग जिवंत गोवंश जनावरे किंमती ३,३५,०००/–रू असा एकुण १३,३५,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी पोशी २३३९ सचिन भगवान येडकर पोस्टे देवलापार यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम २७९, ३४ भादंवी सहकलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ५(अ) ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सह क ११९ सहकलम ४/१२२, १८४, ३/१८१, ११९, १७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक राहुल रंगारी ब. नं. २०१९ पोस्टे देवलापार हे करीत आहेत.

### (मिसिंग)

### हरविलेल्या मुलींचा शोध होणेबाबत

कु. अंजली परदेशी भारद्वाज, वय १८ वर्षे, रा. चनकापूर वार्ड क्र. ०४ ही दिनांक १४/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०८.०० वा. सुमारास हिने आपल्या वडीलाला सांगितले की, मी दुकानात चनकापुर येथे सामान आणायला जात आहे. असे सांगुन घरून निघुन गेली परंतु आज पावेतो घरी परत आली नाही.

बेपत्ताचे वर्णन– उंची ५ फुट ०२ इंच, रंग सावळा, बांधा सळ पातळ, अंगात आकाशी रंगाचा सलवार सुट, काळया रंगाची ओढणी, चेहरा चपटा, भाषा हिंदी.

यााबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक अनिल राऊत मो. क्र. ८६६८३८५५७६ किंवा पोहवा प्रफुल राठोड मो. क्र. ८८०६८२८५६० किंवा टेलीफोन क्र. ०७११३—२६८१२६ वर कृपया संपर्क साधावा. याप्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे मिसींग क्र. ३९/२०२३ अन्वये नोंद करण्यात आली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर